# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 15 January 2026

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १५ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकांसाठीची मतदान प्रक्रिया थोड्याच वेळात सुरू, प्रथमच प्रभागनिहाय मतदान
- मराठवाड्यातल्या पाच महानगरपालिकांसाठी ३९६ जागांवर सर्वपक्षीय चुरस
- नीती आयोगाच्या निर्यात सज्जता निर्देशांकात महाराष्ट्र अव्वलस्थानी
- मकरसंक्रांतीचा सण देशभरात पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा

आणि

- डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनी विविध कार्यक्रमांचं आयोजन

****

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकांसाठीची मतदान प्रक्रिया थोड्याच वेळात सुरू होत आहे. सर्व महापालिकांच्या ८९३ प्रभागांतल्या दोन हजार ८६९ नगरसेवक पदांसाठी १५ हजार ९३१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. एकूण तीन कोटी ४८ लाखांपेक्षा अधिक मतदार, या सर्व उमेदवारांचं राजकीय भवितव्य ठरवणार आहेत.

****

मराठवाड्यात मतदान होत असलेल्या पाच महापालिकांपैकी छत्रपती संभाजीनगर इथं ११५ जागांसाठी ८५९ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. जालना इथं ६५ जागांसाठी ४४९ उमेदवार, परभणी ६५ जागांसाठी ४०१, लातूर ७० जागांसाठी ३५६, तर नांदेड महापालिकेच्या ८१ जागांसाठी ४९१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

छत्रपती संभाजीनगर शहरात एक हजार २६७ मतदान केंद्र असून, जालना इथं २९१, परभणी इथं ३४१, लातूर ३७५ आणि नांदेड इथं ६०० मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. महापालिकांसाठी प्रभागनिहाय मतदानाची ही पहिलीच वेळ आहे. या मतदान प्रक्रियेविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**महानगरपालिकांमध्ये यंदा तीन, चार किंवा पाच सदस्यीय प्रभागरचना असल्यानं मतदारांना आपल्या प्रभागात जितके सदस्य, तितकं मतदान करावं लागणार आहे. प्रभागातल्या प्रत्येक मतदरासंघासाठी मतदान यंत्रावर वेगवेगळ्या रंगाच्या मतपत्रिका असतील. या प्रत्येक मतपत्रिकेवर सर्व उमेदवारांची नावं तसंच वरीलपैकी एकही नाही अर्थात नोटा हा पर्याय असेल. मतदाराला सर्व रंगांच्या मतपत्रिकेवरचं आपल्या पसंतीचं एक–एक बटण दाबायचं आहे. बटण दाबलं की त्यासमोरचा छोटा लाईट लागेल, सगळ्यात शेवटच्या मतपत्रिकेवरचं बटण दाबलं की 'बीप' असा आवाज येईल. हा आवाज म्हणजे आपण दिलेली सर्व मतं नोंदवली गेल्याचा संकेत आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेनं तयार केलेल्या सीएसएमसी वोट कर डॉट कॉम या संकेतस्थळावर मतदारांना या मतदानाचं प्रात्यक्षिक करुन पाहता येणार आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी नागरीकांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.**

**जी श्रीकांत – लक्षात ठेवा मतदानाची तारीख १५ जानेवारी २०२६. यंदा एका मतदाराला चार मतदान करण्याचा अधिकार आहे. वोट कर, छत्रपती संभाजीनगर.**

****

नागरिकांना मतदान करता यावं, यासाठी महापालिका क्षेत्रातल्या सर्व कार्यालयांना आज सुटी जाहीर करण्यात आली आहे. विविध ठिकाणी मतदान करणाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून अनेक आस्थापनांकडून सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत.

सर्व मतदान केंद्रांच्या परिसरात चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे. मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मतदान केंद्रांच्या २०० मीटर परिसरात कोणत्याही प्रकारचा मंडप, दुकानं किंवा तात्पुरत्या स्वरूपाच्या रचना उभारण्यास बंदी आहे. या परिसरात लाउडस्पीकरसह कोणतीही इलेक्ट्रॉनिक साधनं बाळगण्यास तसंच वापरण्यावर, आणि निवडणूक कामाशी संबंधित नसलेली खाजगी वाहनं मतदान

केंद्र परिसरात आणण्यास मनाई करण्यात आली आहे. कोणत्याही राजकीय पक्षाची चिन्हे, झेंडे, बॅनर किंवा प्रचार साहित्य प्रदर्शित करण्यास बंदी राहील. तसंच निवडणूक प्रक्रियेशी थेट संबंध नसलेल्या व्यक्तींना मतदान केंद्र परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. मतदान प्रक्रियेदरम्यान मतदारांच्या सुविधेसाठी मतदान केंद्र परिसरात रुग्णवाहिकांसह वैद्यकीय पथकंही तैनात करण्यात आली आहेत.

****

राजकीय पक्षांना जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत तात्पुरत्या स्वरुपात निवडणूक चिन्ह आरक्षित करण्यासंदर्भात अर्ज प्रक्रियेसाठीची मुदत आज संपत आहे. निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत आणि विशिष्ट अटी पूर्ण करणाऱ्या नोंदणीकृत, पण मान्यताप्राप्त नसलेल्या पक्षांसाठी ही सुविधा असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक प्रक्रियेबाबत काल जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी तातडीने आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रशासकीय तयारी, प्रतिबंधात्मक कारवाया, तसंच कायदा सुव्यवस्था याबाबत आढावा घेतला.

****

निर्यात सज्जता निर्देशांकात महाराष्ट्र अव्वल असल्याचं नीती आयोगाच्या अहवालात म्हटलं आहे. निर्यात करण्याबाबतची राज्याची क्षमता आणि तयारी दर्शवणारा चौथा निर्यात सज्जता अहवाल निती आयोगानं काल प्रसिद्ध केला. राज्याचं निर्यात धोरण, व्यवसाय सुलभता, पायाभूत सुविधांची उपलब्धता तसंच प्रत्यक्ष निर्यात अशा अनेक बाबींवरुन हा निर्देशांक ठरवला जातो. राज्यं आणि जिल्ह्यांच्या सज्जतेमुळे भारताच्या निर्यात वाटचालीला वाढत्या क्रमानं आकार मिळत आहे, असं निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी व्ही आर सुब्रह्मण्यम यांनी सांगितलं. या अहवालानुसार महाराष्ट्रानंतर तामिळनाडू, गुजरात, उत्तर प्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि पंजाब या राज्याचा क्रमांक लागतो. लहान आकाराच्या राज्यांमध्ये उत्तराखंड निर्यात सज्जतेत पहिल्या क्रमांकावर आहे.

****

छत्तीसगढच्या सुकमा जिल्ह्यात २९ नक्षलवाद्यांनी काल आत्मसमर्पण केलं. त्यांच्यापैकी एकावर दोन लाखांचं बक्षीस होतं.

****

मकरसंक्रांतीचा सण काल सर्वत्र साजरा झाला. महिलावर्गाने पारंपरिक पद्धतीने सौभाग्यदानं आणि तीळगूळ देऊन हा सण साजरा केला. देशभरात विविध स्वरुपात हा सण साजरा केला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली इथं केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन यांच्या निवासस्थानी पोंगल समारंभात सहभाग घेतला. कृषी संस्कृतीशी जोडलेल्या या उत्सवाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करतांना पंतप्रधान म्हणाले..,

**बाईट– पंतप्रधान नरेंद्र मोदी**

****

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३२ वा नामविस्तार दिन काल साजरा झाला. यानिमित्तानं छत्रपती संभाजीनगरसह विद्यापीठाशी संलंग्नित महाविद्यालयांमध्ये विविध कार्यक्रम पार पडले. विद्यापीठात, 'नामविस्ताराची हकिकत' या विषयावर प्रख्यात कवी फ.मु.शिंदे यांचं व्याख्यान झालं. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नाव देणं हा फक्त प्रशासकीय निर्णय नव्हता, तर तो दलित–बहुजन समाजाच्या आत्मसन्मानाचा आणि बौद्धिक हक्काचा लढा होता, असं प्रतिपादन शिंदे यांनी यावेळी केलं. कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी यावेळी बोलतांना, बाबासाहेबांच्या नावाला साजेसं काम इथले शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांकडून होणं अपेक्षित असल्याचं मत व्यक्त केलं.

****

नामविस्तार दिनानिमित्त भीमगीत गायनासह विविध स्पर्धांचं बक्षीस वितरण काल करण्यात आलं. अँटी रॅगींग सप्ताहनिमित्त घेतलेल्या स्पर्धांची पारितोषिकं प्रदान करण्यात आली. यामध्ये रिल्स स्पर्धेत पवन देवडे, पोस्टर स्पर्धेत मानसी जोशी, तर निबंध स्पर्धेत वर्षा विश्वभिते यांना प्रथम क्रमांकाचं बक्षीस देऊन गौरवण्यात आलं. यासोबतच वार्षिक परिक्षेतल्या गुणवंत ११ विद्यार्थ्यांना सुर्वणपदक प्रदान करण्यात आलं.

****

विद्यापीठ प्रवेशद्वारावर विविध सामाजिक संघटनांकडून बाबासाहेबांना आदरांजली अर्पण करण्यात आली. बौद्ध महासभेच्या वतीने मिलिंद महाविद्यालयापासून प्रवेशद्वारापर्यंत भव्य रॅली काढण्यात आली. राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण

महासंघाच्या वतीने भीमगीतांचा कार्यक्रम घेण्यात आला. रांगोळीच्या माध्यमातून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलं.

****

राजकोट इथं काल झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताला न्यूझीलंडकडून सात गडी राखून पराभव पत्कराला लागला. प्रथम फलंदाजी करत भारतीय संघाने निर्धारित षटकात सात बाद २८४ धावा केल्या. के एल राहुलने ९२, शुभमन गीलने ५६ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल आलेल्या न्यूझीलंडच्या संघाने डैरिल मिचेल याच्या नाबाद १३१ धावांच्या बळावर हे लक्ष्य साध्य केलं तीन सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघ एक – एकनं बरोबरीत आहेत.

****

बासर – नविपेट रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाच्या कार्यासाठी लाईन ब्लॉक घेण्यात आल्यामुळे १७ ते २३ जानेवारी दरम्यान काही गाड्यांच्या वेळापत्रकात तात्पुरते बदल करण्यात येणार आहेत. काही गाड्या रद्द तर काही गाड्या अंशतः रद्द करण्यात आल्या आहेत. दक्षिण मध्ये रेल्वेच्या नांदेड इथल्या जनसंपर्क विभागाने ही माहिती दिली.

****

बीड जिल्हा परिषदेनं 'गोष्ट बीड जिल्ह्याच्या इतिहासाची' या इतिहास विषयक पुस्तकावर आधारित प्रज्ञाशोध परीक्षेचं आयोजन केलं आहे. चार फेब्रुवारी २०२६ रोजी ही परीक्षा होणार असून, सहभागासाठी इच्छुक शाळांनी संपर्क साधण्याचं आवाहन बीड जिल्हा इतिहास परिषदेनं केलं आहे.

****